# पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय.

## प्रेसनोट

दिनांक १८/०१/२०२२

**“ सामाजिक सुरक्षा विभाग यांचे पथकाने विनापरवाना अवैधरित्या देशी-विदेशी दारुच्या बाटल्या ताब्यात बाळगुन त्याची गिऱ्हाईकास विक्री करणाऱ्या इसमावर कारवाई केलेबाबत.”**

मा. पोलीस आयुक्त श्री. कृष्ण प्रकाश, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय यांनी पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये अवैध धंद्यावर प्रतिबंध करण्याच्या अनुषंगाने माहिती काढुन कारवाई करणेबाबत आदेश दिल्याने सामाजिक सुरक्षा पथक हे पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये अवैध धंद्यावर कारवाई करण्याच्या अनुषंगाने गोपनिय माहिती काढत असताना दिनांक १७/०१/२०२२ रोजी आळंदी पोलीस स्टेशन हद्दीत विनापरवाना अवैधरित्या स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी देशी-विदेशी दारुच्या बाटल्या ताब्यात बाळगुन त्याची गिऱ्हाईकास विक्री करणाऱ्या इसमांवर कारवाई करण्यात आली आहे.

दिनांक १७/०१/२०२२ रोजी सामाजिक सुरक्षा विभागाचे पथकातील पोलीस अंमलदार यांनी आळंदी पोलीस स्टेशन हद्दीत कौस्तुभ दौंडकर हा त्याचे राहते घरी तसेच घराचे बाजुला असलेल्या रुममध्ये विनापरवाना अवैधरित्या स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी देशी-विदेशी दारुची विक्री करीत आहे. अशी गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीवरुन सामाजिक सुरक्षा विभागाचे पथकातील पोलीस अंमलदार यांनी आळंदी पोलीस स्टेशन हद्दीत सापळा रचुन १४:१० वा. चे सुमारास सापळा रचुन छापा टाकुन खालील मुद्देमाल आरोपीच्या ताब्यात मिळुन आला त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

१) २६६०/- रु रोख रक्कम
२) १,१६,१६०/- रु किं च्या विविध कंपनीच्या देशी-विदेशी दारुच्या बाटल्या.

-----------------------------------

**असा एकुण १,१८,८२०/- रु किं चा मुद्देमाल** मिळुन आला म्हणुन इसम नामे १) कौस्तुभ दिलीप दौंडकर वय ३२ वर्षे रा. वहिले आळी चावडी चौक, आळंदी ता. खेड जि. पुणे **तसेच पाहिजे आरोपी नामे** २) शेफे वाईन्सचा चालक मालक (पुर्ण नाव पत्ता माहित नाही) यांनी त्यांचे वाईन्स शॉपमधुन कौस्तुभ दिलीप दौंडकर यास अनुज्ञप्तीच्या अटी शर्तीचे उल्लंघन करुन मोठ्या प्रमाणात नियमापेक्षा अधिक प्रमाणात देशी-विदेशी दारुच्या बाटल्याची विक्री केली म्हणुन त्यांचेविरुध्द आळंदी पोलीस स्टेशन येथे गुरनं १३/२०२२ महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५(ई), ८२ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असुन पुढील तपास आळंदी पोलीस स्टेशन करीत आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त श्री. कृष्ण प्रकाश, मा. अप्पर पोलीस आयुक्त, श्री. डॉ. संजय शिंदे, मा. पोलीस उप-आयुक्त, (गुन्हे) श्री. काकासाहेब डोळे, मा. सहा. पोलीस आयुक्त डॉ. श्री. प्रशांत अमृतकर, पोलीस निरीक्षक श्री. देवेंद्र चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार किशोर पढेर, सुनिल शिरसाट, नितीन लोंढे, भगवंता मुठे, संगिता जाधव, मारुती करचुंडे, राजेश कोकाटे, अतुल लोखंडे, योगेश तिडके, सोनाली माने यांनी केली आहे.

